# Key to
# Navjeevan Practice Book

Standard
**4**

**Teacher's Copy**

# मराठी सुलभभारती

**NAVJEEVAN PUBLICATIONS PVT. LTD.**

**EDUCATIONAL PUBLISHERS**

NAVJEEVAN

**NAVJEEVAN PUBLICATIONS PVT. LTD.**

**EDUCATIONAL PUBLISHERS**

MUMBAI

4940/1B, Dhobiwadi, Dr. Jaykar Marg, Opp. Datta Mandir, Thakurdwar, Mumbai - 400 002.

**Only Calling:** 8291852601

**Calling & Whatsapp:** 9322531798 / 8291852631 / 8291972352

**Website:** www.navjeevanpublications.com

**Email: For enquiry -** info@navjeevanpublications.com **For order -** acc.nppl@gmail.com

PUNE

470 /471, Raviwar Peth, Nandan Residency, 1st Floor, Phadke Haud, Pune - 411 002.

**Tel.:** (020) 24432951 / 7066835645



## अनुक्रमणिका


| पा. क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | झाड (A tree) | 3 |
| २. | मैत्री (Friendship) | 3 |
| ३. | मुलांनी काढलेली चित्रे – १ (The pictures drawn by the students - 1) | 4 |
| ४. | चित्रवर्णन (Description of a picture) | 6 |
| ५. | गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या (Let us play in the rain) | 6 |
| ६. | फरक ओळखा (Find the difference) | 6 |
| ७. | अक्षरजाळे (Webword) | 7 |
| ८. | गंमतकोडे (Fun puzzle) | 8 |
| ९. | वाचूया, गिरवूया (Let us read and form letters) | 8 |
| १०. | ओळखा पाहू! (Try to recognise!) | 8 |
| ११. | शब्दपट वाचूया (Let us read the word series) | 9 |
| १२. | शब्दांशी खेळूया (Let us play with words) | 9 |
| १३. | ओळखूया, सांगूया (Let us recognise and tell) | 10 |
| १४. | खेळातील स्वयंपाक (Cooking while playing) | 10 |
| १५. | झाड आपला मित्र (Tree - Our friend) | 11 |
| १६. | चतुर कासव (The clever tortoise) | 12 |
| १७. | पाहा, पण ......... (Watch, but .............) | 13 |
| १८. | माझा अनुभव – १ (My Experience - 1) | 13 |
| १९. | आगगाडी (A train) | 14 |
| २०. | मुलांनी काढलेली चित्रे – २ (The pictures drawn by the students - 2) | 15 |
| २१. | बसस्थानक (Bus station) | 16 |
| २२. | स्वच्छ घर – स्वच्छ परिसर (Clean home - Clean surroundings) | 17 |
| २३. | माझा अनुभव – २ (My experience - 2) | 17 |
| २४. | ईद (Eid) | 18 |
| २५. | संगणक (Computer) | 19 |
| २६. | आमचे चुकले (We made a mistake) | 20 |
| २७. | धाडसी झुगी (Courageous Jhugi) | 21 |
| २८. | प्रश्न (A question) | 23 |
| २९. | मी सगळ्या भाज्या खाणार! (I will eat all kinds of vegetables!) | 24 |
| ३०. | खुर्ची आणि स्टूल (A chair and a stool) | 25 |
| ३१. | आपलं वाचनालय (Our Library) | 26 |

# मराठी सुलभभारती

## १. झाड (A tree)

■ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) घराजवळ एक झाड चिंगीनं लावलं.

(२) चिंगी झाडाला म्हणाली, "लवकर वाढ".

(३) चिंगी झाडासाठी गाणी गाणार.

(४) गाणी ऐकून फुलं फुलतील, फुलपाखरांचे थवे झुलतील, फुलं छान फुलतील पानन्‌पान हसत राहील.

■ **शेवटची अक्षरे जुळणारे कवितेतील शब्द सांगा.**

(१) फुलतील, झुलतील, छान, पान

---

## २. मैत्री (Friendship)

■ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) मुलगा झाडामागे उभा आहे.

(२) झाडाला सफरचंद लागलेली आहेत.

(३) मुलगा हत्तीला घाबरला.

(४) मुलगा हत्तीला घाबरल्यामुळे झाडावर चढला.

(५) झाडाखाली हत्ती उभा आहे.

(६) हत्तीने सोंड मुलाच्या जवळ नेल्यावर मुलगा घाबरला. हत्तीला फळ दिले तर तो आपल्याला काही करणार नाही असे वाटल्याने मुलाने हत्तीच्या सोंडेत फळ दिले.

(७) मुलाने सफरचंद दिल्यामुळे हत्तीला आनंद झाला.

(८) गोष्टीतील मुलाच्या जागी तुम्ही असता तर तुम्ही काय केले असते ते विद्यार्थ्यांनी स्वत: सांगा.



(९) मुलगा झाडावरून खाली उतरला आहे.

(१०) विद्यार्थ्यांनी स्वत: एखाद्या कथेचा शोध घेऊन मुलांच्या चातुर्याची गोष्ट सांगा.

■ **गाळलेले शब्द भरा.**

हत्ती जंगलात राहतो. हत्ती हा एक खूप **मोठा** प्राणी आहे. हत्तीला **चार पाय** असतात. त्याचे कान **सुपासारखे** असतात. हत्तीला एक **सोंड** असते.

---

## ३. मुलांनी काढलेली चित्रे – १

### (The pictures drawn by the students - 1)

■ **पाहा व बोला. चित्रावरून गोष्ट सांगा.**

एका जंगलात एक कासव आणि ससा राहत होते. ससा नेहमी कासवासमोर बढाया मारत असे. त्याच्यासमोर फुशारकी गाजवत असे. एकदा ससा असाच फुशारकी करीत कासवाला म्हणाला, मी सगळ्यात चपळ आहे. माझ्याबरोबर चालण्याची, पळण्याची बरोबरी कोणीच करू शकणार नाही.

कासव म्हणाले, ससेभाऊ, तुझ्या चपळतेचा तुला एवढा गर्व असेल, तर चल माझ्याबरोबर धावण्याची पैज लाव. आपण दोघे एकाच वेळी निघून त्या डोंगरापर्यंत जाऊ. जर माझ्या आधी तू तिथे पोहोचलास, तर मी तुला बक्षीस देईन आणि जर मी आधी पोहोचलो, तर तू मला बक्षीस देशील. बोल आहे कबूल ?

सशाने कासवाची अट मान्य केली. मग दोघेही एकाच वेळी तिथून निघाले. थोड्याच वेळत ससा बराच पुढे निघून गेला. कासव मात्र आपल्या गतीने चालले होते.

कासव खूपच मागे राहिलेले बघून सशाने विचार केला, कासव अजून बरेच मागे आहे. आपणही धावून दमलो आहोत. थोडावेळ या झाडाखाली विश्रांती घ्यावी आणि पुन्हा ताजेतवाने होऊन धावत सुटावे. म्हणजे कासवाच्या आधी आपण डोंगरापर्यंत पोहोचू.

एखादे वेळी कासव थोडे पुढे जरी निघून गेले तरी त्याला गाठण्यास आपल्याला

कष्ट पडणार नाहीत. चार उड्यातच आपण त्याच्या पुढे जाऊ, असा विचार करत ससा झोपी गेला. थोड्याच वेळात तो घोरू लागला.

कासव मंद गतीने चालत चालत सश्याच्या पुढे निघून गेले आणि थोड्याच वेळात ते डोंगराच्या पायथ्याशी पोहोचले. जेव्हा सशाला जाग आली तेव्हा संध्याकाळ झाली होती. हळू हळू अंधार पडू लागला होता. त्याला शर्यतीची आठवण झाली आणि तो तुफान वेगाने डोंगराकडे पळत सुटला. परंतु डोंगरावर पोहचून पाहतो तर काय कासव आधीपासूनच उपस्थित होते.

■ **चित्रे पाहून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) चित्र क्र.१ मध्ये ससा व कासव हे प्राणी आहेत.

(२) ससा रस्त्याच्या कडेला झोपला आहे. कासव अंतिम ठिकाणी जाऊन पोहोचले आहे.

■ **चित्रावरून तुम्हाला काय समजले ते सांगा.**

नळामधून येणारे पाणी जमिनीवर पडत आहे. पाणी भरण्यासाठी लावलेली बादली व मडके नळाखाली न ठेवता बाजूला ठेवलेले आहे. त्यामुळे पाणी वाया जात आहे. मुलगी हे पाहत आहे. ती 'पाणी वाचवा जीव वाचवा' असे सांगत आहे. जिवंत रहाण्यासाठी पाणी आवश्यक आहे. म्हणून पाणी अनमोल आहे. 'पाणी वाचवले तर आपण आपले जीवन वाचवू' असे या चित्रातून आपल्याला समजते.

(३) चित्र क्र.२ मध्ये नळातून एक एक थेंब खाली पडून पाणी साचले आहे. पाणी फुकट जात आहे. बादली व मडके नळाखाली न ठेवता बाजूला ठेवलेले आहे.

(४) चित्र क्र.२ मधील मुलगी 'पाणी वाचवा. जीवन वाचवा' असे सांगत आहे.

(५) आमच्या घरी पाण्याचा वापर जपून केला जातो.

(६) पाणी वाया जाऊ नये म्हणून तोंड धुताना नळ चालू ठेवणार नाही. शॉवरखाली आंघोळ न करता बादलीत पाणी घेऊन आंघोळ करू. वॉटरबॅगमध्ये उरलेले पाणी टाकून न देता ते झाडांना घालू. काम झाले की नळ बंद करू. विनाकारण नळ सुरू ठेवणार नाही.



## ४. चित्रवर्णन (Description of a picture.)

■ **विद्यार्थ्यांनी स्वतः करा.**

## ५. गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या (Let us play in the rain)

**प्रश्न.१.** (अ) कविता पावसाबद्दल आहे.

(आ) ही कविता मुले म्हणत असतील.

(इ) विजा चमकतात तेव्हा आम्हांला भीती वाटते.

(ई) मुले गारा वेचण्याचा खेळ खेळतात.

(उ) मुलांना आईची हाक ऐकू येते.

**प्रश्न.२.** (अ) गारा (आ) मेघ (इ) वीज (ई) मोर (उ) थंडी

**प्रश्न.३.** साऱ्या, भिंगोऱ्या, गरजती – चमकती, वाजते – येते, साऱ्या – गाऱ्या, चमकती – नाचती, पकडुनि – वितळुनि.

**प्रश्न.४.** छनछन, छमछम, ढमढम, लटलट, रटरट, मटमट, घणघण.

**प्रश्न.५.** **खालील कविता पूर्ण करा.**

**गड्गड् गड्गड्** मेघ गरजती,
चमचम चमचम **विजा चमकती.**
**थुईथुई थुईथुई** मोर नाचती,
गाऱ्या गाऱ्या **भिंगोऱ्या.**

■ **अभिनय करा :**

**विद्यार्थ्यांनी स्वतः कृती करा.**

## ६. फरक ओळखा (Find the difference)


■ **विद्यार्थ्यांसाठी सूचना :** फरक पाठ्यपुस्तकानुसार दिला आहे.

(१) पहिल्या चित्रात बॉल नाही आहे.

(२) दुसऱ्या चित्रातील जाड्या माणसाच्या पँटला खिसा नाही आहे.

(३) दुसऱ्या चित्रात उजव्या बाजूला झाड नाही आहे.

■ गटात न बसणारी आकृती ओळखा. त्यावर (✓) अशी खूण करा.



■ पाहा. आकारात कसा फरक पडत गेला ते सांगा.

विद्यार्थ्यांनी स्वत: अक्षरांच्या आकारात कसा फरक पडला ते सांगा.

■ आकारानुसार गटात न बसणारे अक्षर ओळखा. त्या अक्षराखाली रेघ ओढा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | ष | फ | ल | क | र | ब | व |
| र | श | ज | स | ट | ठ | ढ | ण |
| म | भ | न | ई | | | | |

■ खालील चित्रातील फरक ओळखा.

(१) पहिल्या चित्रात झाडाखाली साप नाही.

(२) दुसऱ्या चित्रात दोन फुलपाखरे आहेत.

(३) पहिल्या चित्रात दोन मधमाश्या आहेत.

## ७. अक्षरजाळे (Webword)

■ विद्यार्थ्यांनी स्वत: करा.





## ८. गंमतकोडे (Fun puzzle)

अ अननस अडकित्ता

आ आरसा आईस्क्रिम

ओ ओढणी ओठ

औ औत










अं अंगठी अंडी अंजीर

## ९. वाचूया, गिरवूया (Let us read and form letters)

■ विद्यार्थ्यांनी स्वत: करा.

## १०. ओळखा पाहू! (Try to recognise!)

■ चित्रे पाहा. नावे सांगा. नावे पूर्ण करा व वाचा.

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| इ मा रत | मा सा | चि म णी | गु ला ब |
|  |  |  |  |
| प तं ग | हौ द | रु माल | बै ल |
|  |  |  |  |
| घो डा | कु त्रा | फू ल | के ळी |

## ११. शब्दपट वाचूया (Let us read the word series.)

■ विद्यार्थ्यांनी स्वत: करा.

---

## १२. शब्दांशी खेळूया (Let us play with words)

| | | |
|---|---|---|
| (अ) नागपूर | (आ) चिंचवड | (इ) चाळीसगाव |
| (ई) कोल्हापूर | (उ) मोरगाव | (ऊ) बारामती |
| (ए) गडचिरोली | (ऐ) बत्तीसशिराळा | (ओ) घोडेगाव |
| (औ) आंबेगाव | | |

■ खालील शब्दांना 'पूर' शब्द जोडा. गावांची नावे लिहा. वाचा.

खाना **पूर** सोला **पूर** विजा **पूर** राजा **पूर**

■ खालील शब्दांना 'वाडी' शब्द जोडा. गावांची नावे लिहा. वाचा.

पळस **वाडी** सावंत **वाडी** कुर्डू **वाडी** किर्लोस्कर **वाडी**

■ खालील शब्दांना 'बाद' शब्द जोडा. गावांची नावे लिहा. वाचा.

| | | |
|---|---|---|
| अहमदा **बाद** | अलाहा **बाद** | औरंगा **बाद** |
| हैदरा **बाद** | उस्माना **बाद** | फरीदा **बाद** |
| फैजा **बाद** | फारुख **बाद** | इस्लामा **बाद** |

■ खालील शब्दांना 'नगर' शब्द जोडा. गावांची नावे लिहा. वाचा.

| | | |
|---|---|---|
| अहमद **नगर** | भाव **नगर** | दालमिया **नगर** |
| श्रीगंगा **नगर** | मोदी **नगर** | मुजफ्फर **नगर** |
| उल्हास **नगर** | वालचंद **नगर** | |



## १३. ओळखूया, सांगूया (Let us recognise and tell.)



मुलगी पेपर वाचत आहे. शिपाई शाळेची घंटा वाजवत आहे. पोस्टमनच्या हातात पत्र दिसत आहे. तो पत्र देण्यासाठी जात आहे.



मुलगी पेपर वाचत आहे. मुली लंगडी खेळत आहेत. मुले फुटबॉल खेळत आहेत.



मुलगा पेपर वाचत आहे. आजी चष्मा लावून पेपर वाचत आहे. कंडक्टर एका प्रवाश्याला तिकीट देत आहे. त्या दोघांमध्ये काही बोलणे सुरू आहे.

---

## १४. खेळातील स्वयंपाक (Cooking while playing)

■ खालील कामांसाठी कवितेत आलेल्या कृती क्रमाने सांगा.

(अ) पोळी करणे – पिठामध्ये पाणी घालणे. तिंबून तिंबून कणीक मळणे. पोळी लाटणे. पोळी तव्यावर फुगणे.

(ब) भाजी करणे – विळीवरती वांगी चिरणे. त्यात गरम मसाला भरणे. कढईत तेल, मोहरी फुटणे. तिखट घालून रस्सा करणे.

(क) भात करणे – तांदूळ भांड्यात भरणे. पाण्याची वर धार सोडणे. कुकरच्या तोंडात शिट्टी कोंबणे.

■ खालील कृतींसाठी कोणती साधने लागतात ते सांगा.

(अ) तवा, गॅस, उलथणे (ब) सुरी, विळी, ताट

(क) तांदूळ, पातेले, पाणी, गॅस, कुकर, चिमटा

■ **खालील अक्षरांपासून नवीन शब्द बनवा.**

(अ) काल, पाल, लय, लपा, काय, कापा, पाय

(आ) कसा, कप, नाक, साप, नाटक

(इ) कर, कस, रवी, रस, रमा, मार, मास, वीर, वीस, सर

(ई) मोर, मोह, पार, पाणी, हर, हरी, मोहर, पाहणी

■ **कसे ते लिहा.** (१) तिंबून, तिंबून (२) भरभर भरभर

■ **चित्र पाहा. वर्णन करा.**

गावाकडचे दृश्य आहे. सर्वत्र हिरवेगार झाले आहे. चित्रात झाडे, घरे, गोठा दिसत आहे. आकाशात पक्षी उडताना दिसत आहेत. मुले चेंडूने खेळत आहेत. विहीर दिसत आहे. विहिरीवर मडके आहे. एक बाई व पुरुष शेतीच्या कामासाठी जात आहेत. माणसाच्या हातात नांगर तर स्त्रीच्या हातात टोपली आहे. एका घराबाहेर शेळ्या आहेत. नदी वाहताना दिसत आहे. मन प्रसन्न करणारे चित्र आहे.

■ **पाठ्यपुस्तकातील चित्राचे वर्णन :**

गावाकडील निसर्गरम्य चित्र आहे. पावसाचे वातावरण आहे.
समोर डोंगर दिसत आहेत. धुके पसरले आहे. नदी वाहत आहे.
सगळीकडे हिरवेगार गवत व झाडे दिसत आहेत.
छोटी कौलारू तीन घरे दिसत आहेत. घराकडे जाण्यासाठी छोटी वाट दिसत आहे.

## १५. झाड आपला मित्र (Tree - Our friend)

■ **चित्र पाहा. झाडाचे उपयोग सांगा.**

झाडांमुळे ऑक्सिजन मिळतो. झाडे आपल्याला सावली, फळे, फुले देतात. झाडांपासून लाकूड, कागद, शाई, डिंक मिळतो. झाडांच्या मूळ, खोड, बिया, पानांपासून औषधे तयार केली जातात. झाडांवर पक्षी घरटे बांधतात, त्यामुळे झाडे हे त्यांचे निवासस्थान आहे. पशुपक्ष्यांना खाद्य जसे बिया, गवत, चार, पाने झाडांपासून मिळते. झाडांपासून मिळालेले वाळलेले लाकूड इंधन म्हणून वापरले जाते. झाडांमुळे प्रदूषण कमी होऊन हवा शुद्ध रहाते.

■ **विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**



■ पहिला फलक झाडाचे उपयोग कोणकोणते होतात ते सांगतो. दुसरा फलक झाडे तोडू नयेत, झाडे लावा हा संदेश देतो.

सर्वांनी झाडांची काळजी घ्यावी. झाडांचे महत्त्व समजावे. झाडे जगली तर आपण जगू. हे लक्षात आणून देण्यासाठी झाडाने त्याच्या खोडाला फलक लावले आहेत.

■ **शब्दपट्ट्या वाचा. वाक्ये तयार करा व सांगा.**

झाडे फळे देतात. झाड फळ देते. झाडे औषधी देतात. झाड औषधी देते.

झाड फूल देते. झाडे फुले देतात.

■ **'खेळातील स्वयंपाक' या कवितेत आलेले जोडाक्षरयुक्त शब्द पाहून लिहा.**

प्रत्येकाला, स्वयंपाक, शिट्टी, भांड्यात, पाण्याची, त्यात, रस्सा, तव्यावरती, आम्ही.

■ **खालील शब्दांमध्ये लपलेले शब्द शोधा. सांगा.**

(१) ऊस, पास (२) मुळे, वाद, वाळा, वाळे, मुळा, दवा

■ **उपक्रम**

**विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**

## १६. चतुर कासव (The Clever tortoise)

■ **या गोष्टीत कोल्हा, कासव हे शब्द वेगवेगळ्या प्रकारे आले आहेत. ते वाचा. आता खालील शब्दांची अशीच वेगवेगळी रूपे सांगा.**

(अ) आईने, आईला (आ) झाडाने, झाडाला

(इ) घोड्याने, घोड्याला

■ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) कासव जंगलाकडे निघाले होते.

(२) कोल्हा आपल्या दिशेने येत असल्याचे पाहून कासव घाबरले.

(३) कोल्ह्याने कवच पाहिले.

(४) कोल्ह्याने कवचाला आपल्या पायाने ओरखडले.

(५) कोल्हा पुढे निघून गेल्यावर कासवाने हळूच मान बाहेर काढली आणि ते पाण्यात शिरले.

■ **चित्र पाहा. वर्णन करा.**

निसर्ग चित्र आहे. दगडांमधून वाहणारा ओढा दिसत आहे. झाडे, गवत दिसत आहे.

---

## १७. पाहा, पण .......... (Watch, but ...........)

■ **प्रश्न. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) मिनू टीव्ही पाहत होती.

(आ) मिनूच्या डोळ्यांना त्रास व्हायला लागला. तिच्या डोळ्यांतून पाणी यायला लागले म्हणून तिने आईला हाक मारली.

(इ) टीव्ही पाहताना जवळ बसून आणि टक लावून टीव्ही पाहू नये. दूर बसून टीव्ही पहावा.

(ई) इतक्या जवळ बसून आणि एकसारखं टक लावून टीव्ही पाहू नकोस डोळे दुखतील असे आईने मिनूला सांगितले होते.

■ **प्रश्न. २. तुम्हांला टीव्हीवरील कोणते कार्यक्रम आवडतात ? ते का आवडतात ते सांगा व लिहा.**

**विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**

---

## १८. माझा अनुभव – १ (My Experience - 1)

■ **प्रश्न. १. कोण म्हणाले, ते लिहा.**

(अ) सुमा म्हणाली. (आ) रेहाना म्हणाली.

(इ) चंदन म्हणाला. (ई) रेहाना म्हणाली. (उ) चंदन म्हणाला.

■ **प्रश्न. २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) रेहाना व सुमन आजारी चंदनला भेटायला त्याच्या घरी गेल्या त्यामुळे चंदनला आनंद झाला.



(आ) 'मी' हा शब्द रेहानसाठी आला आहे.

(इ) 'आम्ही' हा शब्द रेहाना व सुमासाठी आला आहे.

(ई) सुमा आणि रेहानाने चंदनला फुळे व फले दिली.


(उ) आजारी चंदन होता.

■ **प्रश्न.४. घटनाक्रमानुसार खालील वाक्यांचा क्रम लावा. वाक्यासमोर क्रमांक लिहा.**

(अ) (५) (आ) (६) (इ) (४)

(ई) (३) (उ) (१) (ऊ) (२)

■ **पाहा. वाचा. रिकाम्या चेहऱ्यावरचा भाव दाखवा व लिहा.**




---

## १९. आगगाडी (A train)

■ **प्रश्न. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा. (लिहा.)**

(अ) आगगाडीचे अनेक डबे एकमेकांना जोडलेले असतात. प्रत्येक डबा घरासारखा असतो. माळेमध्ये मणी एकामागोमाग एक जसे ओवले जातात. त्याप्रमाणे आगगाडी असते म्हणून तिला घरांची माळ म्हटले आहे.

(आ) आगगाडी गावोगाव जाते.

(इ) आगगाडी पाऊस, वारा, वादळ, यांना भीत नाही.

(ई) आगगाडीला नदी, पहाड कोणी अडवू शकत नाही.

(उ) प्रत्येक झाड आगगाडीला टाटा करते.

(ऊ) सर्वांना घरी आगगाडी पोचवते.

■ **प्रश्न. २. विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**

■ **प्रश्न. ३. आगगाडी प्रवासाचा तुमचा अनुभव सांगा.**

मी मुंबईत रहाते. माझ्या मावशीकडे रत्नागिरीत आम्ही एकदा गणपतीसाठी रेल्वेने जात होतो. आम्ही कोकण रेल्वेने पहाटेच निघालो. आम्ही मुलांनी खिडकीच्या शेजारी जागा घेतली. आमचे सर्व लक्ष खिडकीबाहेरच होते. पाऊस पडत होता. सगळीकडे लाल माती, हिरवे डोंगर दिसत होते. खाली हिरवीगार शेते होती. नद्या, धबधबेसुद्धा खूप दिसत होते. गाडी मध्ये मध्ये बोगद्यातून जात होती. त्यामुळे आगगाडीत भीती पण वाटायची. आम्हा मुलांची खाण्यापिण्याची चंगळच होती. हा प्रवास कधी संपू नये असेच वाटत होते.

■ **प्रश्न. ४. वेगवेगळ्या वाहनासंबंधी कविता गोळा करा. संग्रह करा.**

**विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**

■ **प्रश्न. ५. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(१) अजब (२) हुंदडत (३) पाऊस, वाऱ्याची

(४) झाडान्झाड (५) छंद, उद्योग

---

## २०. मुलांनी काढलेली चित्रे – २


## (The pictures drawn by the students - 2)

■ **पाहा व बोला.**



(१) वेगवेगळ्या आकाराची मडकी आहेत.

(२) एक मुलगी मडकी पाहत आहे.



(१) चित्रात तीन कोंबड्या दिसत आहे. त्यातील दोन कोंबडीची पिल्ले आहेत.


(२) एक पिल्लू कोंबडीच्या पाठीवर बसले आहे. एक पुढे आहे.






(१) समुद्रकिनारी नारळाची झाडे आहेत. एक मुलगा होडीत बसला आहे. एक मुलगा पतंग उडवत आहे.

(२) समुद्रकिनारी एक मुलगा पतंग उडवत आहे.




(१) चित्रात बाग दिसत आहे. बागेत फुले आहेत.

(२) एक मुलगी डोरेमॉनसोबत खेळत आहे.




(१) बागेत मुले आहेत. बागेत खूप झाडे आणि गवत दिसत आहे.

(२) मुलांबरोबर डोरेमॉन आहे. कदाचित मुले त्याच्याबरोबर फोटो काढत आहे.





(१) आईस्क्रीमचे दुकान आहे. मुलगी आईस्क्रीमवाल्याकडे मँगो आईस्क्रीम मागत आहे.

(२) दुकानाच्या शेजारी एक मुलगा आंबे विकत आहे.



(१) पाण्यामध्ये गोल आणि त्रिकोण या आकारांचा वापर करून मासा काढलेला आहे.

(२) पाण्यातील बुडबुडे दिसत आहे.



(१) आकाश कंदील आहे.

(२) त्याच्यामध्ये लाल रंग भरला आहे. कंदिलाला चार शेपट्या असून त्यांचा रंग पिवळा व हिरवा आहे.

---

## २१. बसस्थानक (Bus station)

■ **वरील चित्राचे वर्णन करा.**

हे बसस्थानकाचे चित्र आहे. बसस्थानकात अनेक बस थांबलेल्या आहेत. बसस्थानकात आरक्षण कक्ष चौकशी कक्ष तसेच फळांचे दुकान, पुस्तकांचे दुकान व उपाहारगृह आहे. फेरीवाले काही खाद्यपदार्थ घेऊन जात आहेत. आरक्षण कक्षासमोर तिकीट आरक्षणासाठी रांग लागलेली आहे. उपाहारगृह व पुस्तकांच्या दुकानातसुद्धा अनेक माणसे खरेदी करताना दिसत आहेत. चौकशीकक्षाबाहेर प्रवाशांना सूचना ऐकू जावी

म्हणून ध्वनिक्षेपक बसवले आहेत. चौकशीकक्षाशेजारी सूचना फलक आहे. त्याखाली 'आपले शहर स्वच्छ ठेवा'. असा संदेश लिहिला आहे.

गाडी चालवणारा चालक व तिकिट देणारा वाहक मुलांना माहीत व्हावे म्हणून त्यांचीही चित्रे दिली आहेत.

---

## २२. स्वच्छ घर - स्वच्छ परिसर

### (Clean home - Clean surroundings)

■ **पाहा व बोला.**

(२) दुसऱ्या चित्रातील मुलगी कचरा काढत आहे.

(३) तिसऱ्या चित्रात ओला कचरा, सुका कचरा अशा वेगवेगळ्या बादल्या दाखवल्या आहेत.

(४) तिसऱ्या चित्रातील माणूस ओला कचरा 'ओला कचरा' लिहिलेल्या बादलीत टाकत आहे.

(५) चौथ्या चित्रातील महिला ओला कचरा गोळा करणाऱ्या माणसाजवळ देत आहे.

(६) चौथ्या चित्रात कचऱ्याची गाडी दाखवली आहे.

■ **खालील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात लिहा.**

(१) कचरा (२) समुद्रात राहणाऱ्या

(३) प्लॅस्टिकचा (४) कागदी किंवा कापडी पिशव्या

---

## २३. माझा अनुभव - २ (My experience - 2)

■ **प्रश्न.१. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) आई (आ) मुलगा (इ) मुलगा (ई) डॉक्टर

■ **प्रश्न.२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) आईला खूप ताप आला होता म्हणून आई झोपली होती.

(२) मुलाने थंड पाणी घेतले. स्वच्छ रुमाल घेतला. तो थंड पाण्यात बुडवून आईच्या कपाळावर रुमालाच्या घड्या ठेवल्या. आईला चहा करून दिला. आईला झोप लागल्यावर मुलाने घर आवरले. घर स्वच्छ झाडून घेतले.

(३) डॉक्टरांनी आईला तपासले व औषधे लिहून दिली.

(४) आईला झोप लागल्यावर मुलाने घर आवरले. घर स्वच्छ झाडून घेतले.

■ **मी घरी खालील कामे करतो.**

(१) आईला वाटाणे सोलायला मदत करतो.

(२) कपड्यांच्या घड्या घालतो.

(३) जेवायला बसायच्या आधी ताट, वाटी, पिण्याचे पाणी आणून ठेवतो.

(४) झाडांना पाणी घालतो.

(५) घरातल्या कोणी काही वस्तू मागितली तरआणून देतो.

(६) आजी - आजोबांना मोबाईलमध्ये काही गोष्टी लक्षात आल्या नाही तर समजावून सांगतो.

■ **प्रश्न.५. थोडा-थोडासा यासारखे खालील शब्द लिहा.**

(अ) लहानसा (आ) छानसा (इ) काहीसा (ई) नाहीसा

(उ) बारीकसा (ऊ) अल्पसा (ए) जरासा

---

## २४. ईद (Eid)

■ **प्रश्न.१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) उस्मानच्या घरी जॉन, सुरभी, अजय गेले.

(आ) उस्मानच्या घरी रमजान ईद हा सण होता.

(इ) आज रमजान ईद होती म्हणून उस्मानच्या आईने शीरखुर्मा खायला सगळ्यांना घरी बोलावले होते.

■ **प्रश्न.२. कोण कोणाला म्हणाले, ते लिहा.**

(अ) उस्मान सर्वांना म्हणाला.

(आ) जॉन उस्मानच्या आईला म्हणाला.

(इ) अजय उस्मानला म्हणाला.

(ई) सर्वजण उस्मान व उस्मानच्या अम्मीला म्हणाले.

(उ) उस्मानची अम्मी सर्वांना म्हणाली.

■ **विद्यार्थ्यांनी स्वत: चर्चा करा.**

■ **चित्रांवरून सणांची नावे सांगा.**


रक्षाबंधन


गुढीपाडवा


ख्रिसमस


ईद


दसरा


दिवाळी

■ **आपले राष्ट्रीय सण कोणते ? त्यांची नावे सांगा.**

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे आपले राष्ट्रीय सण आहेत. १५ ऑगस्ट या दिवशी स्वातंत्र्य दिन व २६ जानेवारी या दिवशी प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो.

---

## २५. संगणक (Computer)

■ **प्रश्न. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीच्या घरी संगणक आणणार आहेत.

(आ) कवी देश–विदेशांतले मित्र जोडणार आहे.

(इ) आम्ही संगणकावर चित्र बनवतो. खेळ खेळतो. कार्टून बघतो. गोष्टी बघतो. कविता गाणी ऐकतो.

(ई) कवी संगणकाद्वारे संवाद साधणार, दूरच्या व्यक्तीचा चेहरा बघणार, घरी बसून जग बघणार, सर्व व्यवहार झटपट करणार.

■ **प्रश्न. २. शेवटचे अक्षर समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

चित्र–मित्र, साधणार–बघणार, बघणार–करणार, काढणार – जोडणार.

■ **प्रश्न. ३. खालील शब्द लिहा. असे आणखी शब्द शोधा व लिहा.**

पुत्र – चरित्र, पात्र, छात्र, छत्र, सूत्र, यंत्र, गोत्र



झटपट, रटरट, झटझट, चटचट, लटपट

पोहरा

■ **प्रश्न. ४. नवीन शब्द बनवा व लिहा.**

अचूक, असत्य, अविचार, अमाप, अगणित

■ **प्रश्न. ५. काय ते सांगा.**

(१) संगणक (२) गणित (३) चित्र काढणार

(४) संवाद साधणार (५) चेहरा बघणार (६) जग बघणार

(७) व्यवहार

■ **प्रश्न. ६. संगणकाच्या विविध भागांची चित्रे काढा.**

**विद्यार्थ्यांनी स्वत: करा.**

---

## २६. आमचे चुकले (We made a mistake)

■ **प्रश्न. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रवासी शेंगा, संत्री खात होते.

(आ) प्रवाशांचे खाणे झाल्यानंतर गुरुजींनी टरफले, साली गोळा केल्या. कागदात बांधून ठेवल्या.

(इ) सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, थुंकू नये. कोणी तो परिसर अस्वच्छ करत असेल तर त्याला देखील आपण तसे करू नये म्हणून सांगावे.

(ई) गाडीत बसलेल्या प्रवाशाने सानेगुरुजींना पाहताच त्यांना वाकून नमस्कार केला.

■ **प्रश्न. २. तर काय झाले असते ?**

(अ) तर रेल्वेतील प्रवाश्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजले नसते.

(आ) तर रेल्वेतील प्रवाश्यांनी कचरा उचलला नसता आणि त्यांना आपण केलेल्या कृतीचा पश्चात्तापही झाला नसता.

■ **प्रश्न. ३. कोण म्हणाले ते लिहा.**

(१) शेंगा खाणारे प्रवासी सानेगुरुजींना म्हणाले.

(२) सानेगुरुजी

■ **प्रश्न. ४. सार्वजनिक ठिकाणी कचरा करणारे लोक पाहिल्यास तुम्ही त्यांना काय सांगाल ?**

सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणं ही आपली सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. परिसर अस्वच्छ ठेवण्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांना आपल्याला सामोरे जावे लागणार हे त्यांना सांगू.

■ **प्रश्न. ५. आपला वर्ग व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही काय काय कराल ?**

सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊ. वर्गामध्ये तसेच शाळेच्या प्रत्येक मजल्यावर ठिकठिकाणी कचऱ्याचे डबे ठेवू. शाळेच्या परिसरात कचरा असेल तर सर्व मिळून स्वच्छ करू. झाडे लावू.

■ **उपक्रम –**

(१) स्वच्छता असे जेथे आरोग्य वसे तेथे !

(२) साफसफाई करूया रोगराई हटवूया !

(३) स्वच्छ शहर आनंदी शहर

(४) स्वच्छ सुंदर परिसर,
आरोग्य नांदेल निरंतर !

(५) कचरा कुंडीचा वापर करू,
सुंदर परिसर निर्माण करू !

## २७. धाडसी झुगी (Courageous Jhugi)

■ **प्रश्न. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**(अ)** झुगी, लांडगा, कोकरू, झुगीचे आई–बाबा, सरपंच, शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक ही या पाठातील पात्रे आहेत.

**(आ)** झुगी शेतातील झोपडीत राहत होती.

**(इ)** झुगीला कोकराचा बँऽऽबँऽऽ ओरडण्याचा आवाज आला.



**(ई)** लांडगा कोकरावर झडप घालणार होता.

**(उ)** झुगीच्या धाडसाचे कौतुक सरपंचांनी, शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी केले.

**(ऊ)** हुशार, प्रसंगावधानी, धाडसी

■ **प्रश्न. २. का ते सांगा.**

**(अ)** झोपडीबाहेर कोकरू बांधले होते. कोकराचा बँऽऽबँऽऽ ओरडण्याचा आवाज आला. म्हणून झुगी धावत झोपडीबाहेर आली.

**(आ)** झोपडीबाहेर बांधलेल्या कोकराकडे एक लांडगा येताना दिसला. म्हणून झुगी झोपडीत गेली. चुलीतील जळते लाकूड हातात घेतले.


**(इ)** झुगी चुलीतील जळते लाकूड घेऊन बाहेर आली. लांडगा कोकरावर झडप घालणार तेवढ्यात झुगीने जळते लाकूड लांडग्याच्या दिशेने फेकले म्हणून लांडगा घाबरला.

**(ई)** 'पळाऽ पळा, लांडगाऽ पळाऽ', असे झुगी ओरडू लागली. कोणीतरी मदतीला यावे या कारणाने झुगी जोरजोरात ओरडू लागली.

**(उ)** झुगीने दाखवलेल्या धाडसामुळे लांडग्यापासून कोकराचा जीव वाचल्याची बातमी गावात पसरली.

■ **प्रश्न. ३. विद्यार्थ्यांनी स्वतः करा.**

■ **चित्र बघून कोडे पूर्ण करा.**



# २८. प्रश्न (A question)

■ **प्रश्न. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) पशुपक्ष्यांना जगण्याची कला अवगत असते.

(आ) पशुपक्षी आनंदाने कसलीही चिंता न करता जगतात. माणसांच्या मनात मात्र विचारांचा गुंता असतो.

(इ) माणसाच्या मनात विचारांचा गुंता असतो.

■ **प्रश्न. २. खालील पशुपक्ष्यांना कोणते प्रश्न पडत नाहीत ?**

(अ) मिळेल का मला चारा ? (आ) मीच का राबू ?

(इ) मीच का भित्रा ? (ई) काळा का माझा रंग ?

(उ) वापरू कोणता साबू ? (ऊ) मोरासारखा पिसारा का नाही मला ?

(ए) वाघोबासारखा शूरपणा माझ्याकडे का नाही ?

■ **प्रश्न. ३. कोण ते सांगा.**

(अ) मोर (आ) कोकिळ (इ) ससा

(ई) वाघोबा (उ) माणूस (ऊ) पशुपक्षी

■ **प्रश्न. ४. असे घडले तर काय होईल, ते सांगा.**

(अ) आकाराने छोट्या असलेल्या चिमणीला पिसाऱ्याच्या वजनाने उभेदेखील राहता येणार नाही तर उडता येणे शक्यच नाही.

(आ) शेतकऱ्याला बैलाला नांगराला जुंपता येणार नाही त्यामुळे पीक येणार नाही व आपल्याला अन्न मिळणार नाही. माणसालाच सर्व शेतीची कामे करावी लागतील.

(इ) तर ससा वाघोबा बनेल.

■ **प्रश्न. ५. शेवटची अक्षरे जुळणारे शब्द लिहा.**

चिंता–गुंता, भित्रा–कुत्रा पिसारा–चारा रंग–दंग

राबू–साबू अवगत – जमत

■ **प्रश्न. ६. कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

(अ) चिमणी **कधी म्हणत नाही** **हवा मोरासारखा** पिसारा.

(आ) वाघोबाचा **शूरपणा** **मागत नाही** कुत्रा.

(इ) जो तो जगतो आनंदाने **नाही कसली** चिंता.

(ई) कोकीळ **कधी म्हणत नाही** **काळा का माझा** रंग ?

(उ) ससा **कधी म्हणत नाही** **मीच का** भित्रा ?

■ **प्रश्न. ७. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा.**

(अ) कावळा – काळा, वळा

(आ) पिसारा – सारा

(इ) विचारतो – चार, रवि



---

# २९. मी सगळ्या भाज्या खाणार !

## (I will eat all kinds of vegetables!)

■ **प्रश्न. १. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) तेजसला कारल्याची भाजी आवडत नव्हती.

(आ) मंडईत भाजीची दुकाने सजलेली होती.

(इ) टमाटा खाल्ल्यावर गाल लाल होतात.

(ई) मुलांसाठी टमाट्याचे खास सूप व सॉस बनवले जातात.

(उ) डोळ्यांना ताकद मुळा आणि गाजरामुळे मिळते.

(ऊ) आपल्याला पोषक घटक मेथी, चुका, चाकवत, माठ व पालकामधून मिळतात.

(ए) सशक्त होण्यासाठी काकडी खावी.

(ऐ) कारल्यात औषधी गुण असल्यामुळे कधी आजारपण येत नाही.

(ओ) बटाटा भाजून, उकडून, तळून खाता येतो. त्याचा उपयोग वजन वाढण्यासाठी होतो.

(औ) टोमॅटोची कोशिंबीर, भाजी, सूप, सार करतात.

■ **प्रश्न. २. कोण म्हणाले. ते लिहा.**

(अ) तेजस म्हणाला. (आ) टमाटा म्हणाला.

(इ) मुळा व गाजर म्हणाले.

(ई) मेथी, चुका, चाकवत, माठ, व पालक म्हणाले.

(उ) कारले म्हणाले.

(ऊ) मेथी, चुका, चाकवत, माठ व पालक म्हणाले.

(ए) काकडी म्हणाली. (ऐ) कारले म्हणाले.

■ **प्रश्न. ३. शेवटचे अक्षर सारखे असणारे पाठातील शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| उकडून – तळून | खाणार – लागणार | हसू – रुसू |
| घटक – चटक | मिळणार – लागणार | सशक्त – फक्त |
| खाणार – राहणार | रंगाचे – अंगाचे | औषधी – कधी |

■ **प्रश्न. ४. उपयोग लिहा.**

(१) वजन वाढण्यासाठी होतो.

(२) सूप व सॉस बनवण्यासाठी होतो.

(३) मुळा, गाजरामुळे डोळ्यांना ताकद मिळते. डोळे सुंदर राहतात.

(४) पोषक घटक मिळतात.

(५) औषधी कारल्यामुळे कधी आजारपण येत नाही.

## ३०. खुर्ची आणि स्टूल (A chair and a stool)

■ **प्रश्न. १. कोण कोणास म्हणाले ते लिहा.**

(अ) खुर्ची स्टुलाला म्हणाली.

(आ) स्टूल खुर्चीला म्हणाले.



■ **प्रश्न. २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) खुर्ची स्टुलाला म्हणाली "अरे स्टुला, केव्हा येणार चालायला तुला ?"

(२) स्टूल खुर्चीला म्हणाले "त्याच वेळी जेव्हा हाताने वाजवशील टाळी!"

(३) पंखा पाय नसून फिरत बसला.

■ **प्रश्न. ४. खालील शब्द सारणीत योग्य ठिकाणी लिहा.**

उदा.

| तो | ती | ते |
|---|---|---|
| पंखा | खुर्ची | स्टूल |
| फळा | वही | झाड |
| दरवाजा | खिडकी | फूल |

## ३१. आपलं वाचनालय (Our Library)

■ **प्रश्न. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) अतुल सुहासला खेळण्यासाठी बोलवत होता.

(२) वर्तमानपत्रात पशुपक्ष्यांची माहिती येते.

(३) सुहास रद्दीतील कवितांची, गोष्टींची चांगली पुस्तके बाजूला काढतो.

(४) सर्वजण रविवारी भेटून वाचणार, खेळणार, अभ्यास करणार आहेत.

(५) सुहासच्या वाचनालयाचे नाव 'आपलं वाचनालय'.

(६) एक-एक पुस्तक गोळा करून सुहासचे वाचनालय तयार झाले.

■ **प्रश्न. २. सांगा.**

(१) सुहास कात्रणाने कापून वहीत चिकटवतो.

(२) सुहास रद्दीतील पुस्तके बाजूला काढून ठेवतो.

(३) एक-एक पुस्तक गोळा करून वाचनालय तयार झाल्यामुळे सुहासने वाचनालयाला 'आपलं वाचनालय' नाव दिले.

## पाठात दिल्याप्रमाणे तुम्ही वाक्य तयार करा व लिहा.

- ताई माझा अभ्यास घेते.
- आई शाळेत सोडायला येते.
- आजी रोज सकाळी पूजा करते.
- आजोबा संध्याकाळी शुभंकरोति म्हणायला सांगतात.
- आम्ही सर्वजण मिळून सगळे सण आनंदाने साजरे करतो.
- कधी कधी माझे मामा मामी घरी येतात.
- आजी आजोबा माझे खूप लाड करतात.
- शाळेतून आल्यावर मी थोडा वेळ टी.व्ही. पाहातो.
- माझा भाऊ मला संगणकावर बऱ्याच छान छान गोष्टी दाखवत असतो.
- आमच्या घरी शिलाई यंत्र आहे.
- शिलाई यंत्रावर आई मोकळ्या वेळेत काम करते.
- आमचे किराणा मालाचे दुकान आहे.
- माझा मोठा भाऊ बाबांना दुकानाच्या कामात वेळ असेल तेव्हा मदत करतो.
- माझे काका, काकीसुद्धा आमच्याबरोबरच राहतात.
- आजी रोज रात्री आम्हाला गोष्ट सांगते.



## कोडी सोडवा.

